५ — मा. कोर्ट प्रत

**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** नांदेड **P.S.(ठाणे):** नांदेड ग्रामीण

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0488 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**04/07/2023 01:19

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 03/07/2023
**Date To ( दिनांक पर्यंत):** 03/07/2023
**Time From (वेळेपासून):** 12:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 18:20 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 04/07/2023 **Time (वेळ):** 00:57 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 003

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 04/07/2023 00:57 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 02 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** कुंडलेश्वर निवासी अपंग , विद्यालय धनेगाव ,नांदेड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

कार्यालय पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): मारोती परशराम चंदनवार

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1966

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | साईनगर, शासकीय पाणी फिल्टर ,केंद्राजवळ धनेगांव,नांदेड,नांदेड ग्रामीण, नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | साईनगर, शासकीय पाणी फिल्टर ,केंद्राजवळ धनेगांव,नांदेड,नांदेड ग्रामीण, नांदेड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | नारायण भाउराव वाघमारे | | | 1. हस्सा ,नायगाव,,नायगांव , नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | बालाजी किशनराव बामणे पाटील | | | 1. ईब्राहिमपुर, , देगलुर,देगलूर, नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 3 | अरविंद गंगाधर इंगळे | | | 1. ईब्राहिमपुर,देगलुर ,देगलूर, नांदेड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):



Scanned with CamScanner

(2)

**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 3,80,000 | 380,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

380,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

दिनांक 03/07/2023

फिर्याद

मी मारोती परशराम चंदनवार वय 57 वर्ष, व्यवसाय - फोटोग्राफर रा. साईनगर, शासकीय पाणी फिल्टर केंद्राजवळ धनेगांव जिल्हा नांदेड मो.नं 7385397781

समक्ष पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण येथे हजर येवुन फिर्याद देतो की, माझी पत्नी नामे सौ वेणूताई गणपत कन्नलवार (लग्नापूर्वीचे नांव) वय 45 वर्ष हया धनेगांव येथील कुंडलेश्वर निवासी अपंग विदयालय, श्री समर्थ नगर, धनेगांव, ता.जि. नांदेड येथे सन 1999 मध्ये स्वयपाकी या पदावर कार्यरत होत्या. काही कौटुंबीक अडचणी मुळे माझी पत्नी यांनी दिनांक 31.07.2022 रोजी स्वेच्छानिवृत्ती घेतली असुन सध्या त्या गृहीणी असुन माझे सोबत आमचे मुलाबाळासह वरील ठिकाणी राहतात. सेवानिवृत्ती नंतर माझ्या पत्नीस नियमीत पणे पेशंन मिळत असुन माझे पत्नीचे सेवानिवृत्तीचे 24 महीन्याचे पगार व 7 व्या वेतन आयोगा प्रमाणे सुधारीत सेवानिवृत्ती वेतनाचे फरकाची रक्कम मिळणे बाकी आहे.सदर ची रक्कम माझे पत्नीला मिळावी या करीता मी आणी माझी पत्नी असे अंदाजे 8 दिवसापूर्वी कुंडलेश्वर निवासी अपंग विदयालय, समर्थनगर धनेगांव नांदेड शाळा येथे मुख्याध्यापक श्री नारायण भाउराव वाघमारे यांना भेटण्यासाठी गेलो होतो. सदर ठिकाणी संस्थेचे उपाध्यक्ष श्री बालाजी बामणे पाटील हे देखील हजर होते. तेव्हा आम्ही त्या दोघांना भेटुन थकबाकी असलेले 24 महीन्याचे पगार व 7 व्या वेतन आयोगा प्रमाणे सुधारीत सेवानिवृत्ती वेतनाचे फरकाची रक्कम मिळणेसाठी विनंती केली होती.तेव्हा त्यांनी माझे पत्नीला ऑफीसचे बाहेर थांबवून मला सदरचे बील काढण्यासाठी एकुण थकबाकी रक्कमेच्या 45 टक्के रक्कम दयावी लागेल असे सांगुन थकबाकीचे बजेट आणण्यासाठी 8 टक्के रक्कम 83,551/- रूपये घेतले होते.

माझे पत्नीचे थकबाकीची रक्कम काढण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक व उपाध्यक्ष श्री बालाजी बामणे पाटील हे मागत असलेले 45 टक्के रक्कम ही कोणतीही शासकीय फीस नसुन लाच असल्याची मला खात्री झाल्याने व ती मला देण्याची ईच्छा नाही. त्यामुळे त्यांनी स्वतः किंवा त्यांचे वतीने इतर कोणाही माझ्या पत्नीचे थकबाकीचे रक्कम काढण्याचे कामासाठी लाच मागणी केल्यास किंवा लाच मागणी करुन स्विकारल्यास त्यांचेवर योग्य ती कारवाई करण्यात यावी वगैरे मजकुराची तक्रार दिली होती.

मी दिनांक 03/07/2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय नांदेड येथे दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने पोनि श्रीमती स्वप्नाली धुतराज यांनी दोन शासकीय पंच उपलब्ध करुन घेवुन मला दोन्ही पंचाची व सापळा पथकातील सर्व सदस्यांची ओळख करुन दिली. त्यानंतर मी पंचाना माझी तोंडी तक्रार सांगितली. माझी टाईप केलेली तक्रार पंचानी वाचुन तक्रारीवर सहया केल्या आहेत. मी व पोनि श्रीमती धुतराज यांनी तक्रारीवर पुर्वीच सहया केल्या होत्या. त्यानंतर मला व दोन्ही पंचाना लाच मागणी पडताळणीचा उद्देश सांगुन माझे स्वतःचे, पोनि श्रीमती धुतराज व दोन्ही पंचाचे परिचय दर्शक वक्तव्य डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये पोशि/अरशद खान यांनी रेकॉर्ड केले.

त्यानंतर पोनि श्रीमती धुतराज मॅडम यांनी लोकसेवक यांचे ठाव ठिकाण्याबाबत माहिती करण्यासाठी मला माझे मोबाईलवरुन मुख्याध्यापक श्री वाघमारे यांचे मोबाइल क्रमांकावर कॉल करण्यास सांगितले. तेव्हा मुख्याध्यापक वाघमारे यांनी मी व पाटील शाळेवरच आहोत. तुम्ही शाळेवर या असे सांगितले. माझे कॉल मपोनि श्रीमती धुतराज मॅडम यांच्या सुचनेवरुन पोकॉ/अरषद खान यांनी त्यांचे जवळील डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड केले.

त्यानंतर मला व पंच क्र. 1 यांना माझे मोटार सायकलवर व सोबत पोकॉ/अरशद खान हे धनेगाव येथील एच.पी.



कार्यालय पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण

Scanned with CamScanner

पेट्रोल पंपासमोरील सुरक्षित ठिकाणी नेवून मला व पंच क्र. 1 यांना लाच मागणी पडताळणी करण्यासाठी पोकॉ/अरशद खान यांनी त्यांचे जवळील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून माझे गळयात न दिसेल अशा प्रकारे टाकून मला व पंच क्र. 1 यांना लोकसेवक यांची भेट घेण्यासाठी शाळेवर रवाना केले.

मी कुंडलेश्वर निवासी अपंग विदयालय, धनेगाव येथे जावून लोकसेवक मुख्याध्यापक श्री वाघमारे, उपाध्यक्ष श्री बालाजी बामणे पाटील व कोशाध्यक्ष श्री अरविंद इंगळे यांची भेट घेतली असता, त्यांनी मला माझ्या पत्नीचे थकबाकीची जमा झालेली रक्कम 10,44,396/- रूपयेच्या 45 टक्के रक्कम 4,69,978/- रूपये पैकी यापूर्वी तुम्ही 8 टक्के दिलेली रक्कम 83,551/- ही दिली असून ती वजा करून 3,86,427/- रूपये तुम्ही दया असे सांगितले. तेव्हा मी त्यांना काही तरी कमी करा अशी विनंती केली असता, त्यांनी ठिक आहे, सहा हजार रूपये कमी दया 3,80,000/-रूपये दया असे म्हणून मला शासकीय पंचासमक्ष लाचेची मागणी केली. तेव्हा मी त्यांना ठिक आहे, माझे पत्नीसह बँकेत घेवून जावून पैसे काढून आणतो असे म्हणून परत आलो.

त्यानंतर मी माझे पत्नीला घेवून स्टेट बँक ऑफ इंडीया, शाखा सिडको येथून 3,80,000/- रूपये चेकद्वारे काढून ला.प्र.वि. कार्यालय, नांदेड येथे आलो. त्यानंतर पोनि धुतराज मॅडम यांनी त्यांची पुढील कार्यवाही करून मला व पंचाना दिलेल्या सुचनांची उजळणी करून देवून सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर सापळापुर्व कार्यवाही केली ज्यात मला व दोन्ही पंचाना पोकॉ/दाबनवाड यांनी अल्ट्राव्हॉयलेट लॅम्प व अँथ्रासिन पावरडचे गुणधर्म सांगुन अल्ट्राव्हायलेट लॅम्प व अँथ्रासिन पावडर यांच्या वापराचे प्रात्यक्षिक करून दाखविले. त्यानंतर पंचाकरवी माझी अंगझडती घेतली व मी हजर केलेले लाचेच्या रक्कमेचे वर्णन व क्रमांक पंच क्रमांक 2 श्री प्रकाश विठ्ठलराव कानिंदे यांना सोबत घेवून संगणकावर नोटाचे वर्णन टाईप करून घेतले. त्यावर पोनि श्रीमती धुतराज मॅडम यांनी व दोन पंचानी त्यावर सहया केल्या. पोकॉ/दाबनवाड यांनी लाचेच्या रक्कमेस अँथ्रासिन पावडर लावले व सदर रक्कम माझे जवळील पिशवीत ठेवले व लाच स्विकारल्यानंतर करावयाचा इशारा मला सांगुन तशी सविस्तर सापळा पुर्व कार्यवाही केली.

त्यानंतर मी, पचं क्र. 1, पोनि धुतराज मॅडम व पोकॉ/अरशद खान असे धनेगाव येथील एच.पी. पेट्रोल पंपासमोरील सुरक्षित ठिकाणी जावुन पोनि श्रीमती धुतराज यांच्या सुचनेवरून पोकॉ/अरशद खान यांनी त्यांचे जवळील डिजीटल व्हाईस रेकार्डर चालु करून देवुन माझे गळयात सुरक्षित ठेवले व त्यानंतर मी व पंच क्र. 1 असे आम्ही दोघे माझेकडील मोटार सायकल क्रमांक एमएच 26 सीजी 5147 वर बसून कुंडलेश्वर निवासी अपंग विदयालय, श्री समर्थ नगर, धनेगांव, ता.जि. नांदेड येथे गेलो असता, त्याठिकाणी मुख्याध्यापक श्री वाघमारे व कोषाध्यक्ष श्री अरविंद इंगळे हे हजर होते. तेव्हा त्या दोघांनी शासकीय पंचासमक्ष माझे जवळील अँन्थ्रासिन पावडर लावलेले 3,80,000/- रूपये घेवून कोषाध्यक्ष श्री अरविंद इंगळे यांनी त्यांचे हातात घेवून नोटाचे बंडल मोजले. तेव्हा मुख्याध्यापक वाघमारे यांनी 500 चे सात आहेत, 200 चे एक, 100 चे एक असे म्हणत नोटा मोजू लागले. तेव्हा माझे सोबत असलेले पचं क्र. 1 यांनी बाहेर जावून सापळा रचून थांबलेल्या पथकातील सदस्यांना लोकसेवक यांनी लाच स्विकारल्याचा पुर्वनियोजित ईशारा करताच आमचेवर लक्ष ठेवुन असलेले पोनि श्री परखाले, मपोनि धुतराज मॅडम, पंच क्रमांक 2 व सापळा पथकातील सर्व सदस्य तेथे हजर येवुन लोकसेवक मुख्याध्यापक नारायण वाघमारे व कोषाध्यक्ष श्री अरविंद इंगळे यांना 18.20 वाजताचे सुमारास पकडुन पुढील कार्यवाही केली.

तरी दिनांक 03/07/2023 रोजी शासकीय पंचासमक्ष केलेल्या लाच मागणी पडताळणी कार्यवाहीत कुंडलेश्वर निवासी अपंग विदयालय, श्री समर्थ नगर, धनेगांव, ता.जि. नांदेड येथील 1) मुख्याध्यापक नारायण भाउराव वाघमारे, रा. हस्सा, ता. नायगाव, जि. नांदेड, 2) उपाध्यक्ष श्री बालाजी किशनराव बामणे पाटील, 3) कोषाध्यक्ष श्री अरविंद गंगाधर इंगळे, अ.क्र. 2 व 3 रा. ईब्राहिमपुर, ता. देगलुर, जि. नांदेड यांनी माझे पत्नी सेवानिवृत्तीपूर्वीचे 24 महिन्याचे थकबाकी वेतन 10,44,396/- रूपये काढण्यासाठी यापूर्वीच 8 टक्के रक्कम 83,551/-रूपये घेवून ती वजा करून 3,86,427/- रूपयेची शासकीय पंचासमक्ष लाचेची मागणी करून तडजोडीअंती 3,80,000 /- रूपये स्विकारण्याचे मान्य करून सापळा कार्यवाही दरम्यान शासकीय पंचासमक्ष आलोसे 1) मुख्याध्यापक नारायण भाउराव वाघमारे, 2) कोशाध्यक्ष श्री अरविंद गंगाधर इंगळे यांनी माझेकडून 3,80,000/- रूपये लाचेची रक्कम स्विकारून पदाचा दुरूपयोग करून माझे काम केल्याचे बक्षिस म्हणून स्वतःचा आर्थिक फायदा करून घेतला. म्हणुन माझी त्यांचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 प्रमाणे योग्य ती कायदेशिर कार्यवाही होणेस फिर्याद आहे.

समक्ष

फिर्याद दिली सही

( स्वप्नाली धुतराज )



Scanned with CamScanner

पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. नांदेड

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

**or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नावे): पो.नि. स्वप्नाली धुतराज [illegible] (ACB)
dnyaneshwar devidas matwad
**Rank (पद):** SI (Sub-Inspector) **No.(क्र.):** 15101000402DD
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**



Scanned with CamScanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस स्टेशन कार्यालय नांदेड ग्रामीण

(पो.उप.नि. / एस.एस.पिंपरखेडे)
पोस्टे नांदेड ग्रामीण

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): ASHOK YAYATIRAO
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN70668



Scanned with CamScanner